प्रकरण पाचवे

# वाङ्मयीन व भाषिक वैशिष्ट्ये

## प्रकरण पाचवे

# वाङ्मयीन व भाषिक वैशिष्ट्ये

चौथ्या प्रकरणामध्ये मंजुश्री गोखले यांच्या 'तुकयाची आवली' या चरित्रात्मक कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा 'आवली' तसेच इतर व्यक्तिरेखांची स्वभाव वैशिष्ट्ये पाहिली. प्रस्तुत प्रकरणात या कादंबरीची वाङमयीन व भाषिक वैशिष्ट्ये पहावयाची आहेत. यामध्ये कादंबरोचे कथानक, भाषाशैली, निवेदनपद्धती, अलंकाकारीकता, कल्पनाविलास, त्या कालखंडातील लोकजीवन, लग्न, सण, उत्सव, खेळ, रुढी, परंपरा, सामाजिक न्याय-निवाडा, धार्मिक जीवन, निरनिराळे साथीचे रोग, औषधोपचार, औषधीवनस्पती, तेथील व्यवसाय, पिके, दुष्काळ, सामाजिक जिव्हाळा, एकता, त्याचबरोबर संघर्ष आणि रसाविष्कार अशा अनेक घटकांच्या अभ्यासातून संत साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने वर्तमानकाळाच्या पार्श्वभूमीवर सदर कादंबरीची चिकित्सा करावयाची आहे.

**कथानक:**

''कथानक हा कथेचा मूल घटक होय''[१] कथानकात घटना, प्रसंग आणि व्यक्ती हे घटक अतूट असा संबंध प्रस्थापित करून कथासूत्राला अपरिहार्यपणे पुढे खेचित नेतात. कथानकात जिज्ञासा, उत्कंठता, निरगाठ असावी असे ना.सी. फडके म्हणतात.

''कथानक म्हणजे कादंबरीकाराने केलेली व्यक्तींची, कृतीची, प्रसंगाची घटनांची जुळणी''[२]

कथानकासंबंधी वसंत डहाके म्हणतात, ''कादंबरीतील कृती कोणत्या स्थलकालाच्या अवकाशात घडत आहे? कादंबरीतील पात्रे काय करीत आहेत? हे कादंबरीकार सांगत असतो. या साऱ्यांची जुळणी करणाऱ्या एकात्मक घट्ट विणीलाच कथानक असे म्हणतात''[३]

'तुकयाची आवली' कादंबरीत आवलीचा जीवन संघर्ष रेखाटला आहे. केवळ आठ वर्षाच्या आवलीचा विवाह एक मुलगा असणाऱ्या तुकारामांशी होतो. सुरुवातीच्या काळात तुकारामांची साथ आवलीला मिळते परंतु दुर्दैवाने तुकारामांच्या जीवनात संकटाच्या अनेक मालिका सुरू होतात. वडिलबंधूचे परागंदा होणे, भावजयीचा मृत्यू, आईवडिलांचा मृत्यू, दुष्काळ, आजाराने पत्नीचा मृत्यू, लाडक्या मुलाचा मृत्यू, तसेच समाजातील लोकांची

दैनावस्था, मृत्यूचे थैमान, रोग यामुळे तुकारामांच्या जीवनावर आघात होतो. या सर्वातून जीवनमुक्तीचा पर्याय म्हणून तुकाराम विठ्ठलभक्तीचा मार्ग स्विकारतात. ते विठ्ठलाचे रात्रंदिवस नामस्मरण करतात तर आवली संसारासाठी त्यांना परावृत्त करताना दिसते. दुष्काळात त्यांच्यावर पसाभर धान्य मागून आणण्याची वेळ येते. पण स्वाभीमानी आवली माहेरी जाताना दिसत नाही. कादंबरीत आवलीचे आईवडिल तिला भेटावयास येत असल्याचा उल्लेख येत नाही मात्र दुष्काळ पडल्यानंतर आप्पाजी एक दिवस येतात व आवलीला पाहून खूप दुःखी होतात मात्र ते आवलीला त्याही अवस्थेत आधार देताना दिसतात. तुकाराम काही काम करण्याचा निर्णय घेतात पण तेथेही ते अपयशी होतात. भजनात दंग असताना गुरे पीकांचे नुकसान करतात त्याची भरपाई तुकारामांना द्यावी लागते पण विठ्ठलाची कृपा बाळाजीचे पीक वर्षापेक्षा जास्त होते आणि नकळत तुकाराम विठ्ठलाकडे अधिकच ओढले जातात.

आवलीची संसार मुले यासाठीचे ओढग्रस्त जीवन तर तुकारामांची विठ्ठल भक्ती यांचे परस्पर विरोधी चित्रण कादंबरीत येते.

तुकाराम आपल्या भजन-कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना वेदातील ज्ञान देतात ही गोष्ट ब्राह्मण समाजाला खटकते आणि या आरोपाखाली तुकारामांच्या अभंगाच्या वह्या धर्मपंडिताकडून पाण्यात सोडल्या जातात तेव्हा घायाळ तुकारामांना आवली एखाद्या मातेप्रमाणे सांभाळते.

तुकाराम निर्लोभी, परोपकारी वृत्तीचे आहेत म्हणून ते शिवाजी महाराजांनी दिलेला नजराणा स्वीकारू शकत नाही परंतु त्यामुळे आपलं दारिद्रय संपलं असतं हा आवलीचा विचार असतो. ती संतापाने आत्महत्त्या करावयास जाते. पण आत्महत्त्या करीत नाही ती नवरा, मुले, संसार यासाठीच परत येते. तर परत आलेल्या आवलीला पाहून घायाळ तुकाराम स्नेहार्द्र होताना दिसतात.

तुकाराम विठ्ठलाकडे अधिकाधिक ओढले जात असताना आवली तुकारामांना मुलांना काही व्यवहार शिकविण्यास सांगते पण तुकाराम आपल्या आयुष्याबाबत निर्वाणीचे बोलतात. त्यावेळी तिच्या मनात भीती निर्माण होते. तेव्हापासून ती तुकारामांच्या सोबत रहाते, त्यांना किमान लांबून पहाते, पण त्यांना एकट सोडत नाही. होळीच्या सणादिवशी तुकाराम आवलीला सोबत येण्याचा आग्रह करतात पण मुलांना गोडधोड करून देण्यासाठी ती त्या

दिवशी जात नाही आणि याच दिवशी तुकाराम महाराज गरुड असलेल्या कमानीतून आकाशात गेल्याचे स्वप्न पडते. स्वप्न असले तरी ते कटू सत्य होते. आवली भ्रमिष्टासारखी जीवन जगते आणि कधी तरी तुकाराम आपल्याला भेटतील या अपेक्षेने मंदिरामध्ये जाऊन बसते. या काळात तिच्या लहान मुलांचे संगोपन मोठी मुलं करतात. एके दिवशी विठ्ठलाच्या रुपात तिला तुकाराम भेटतात आणि त्यांच्या पश्चातील आपलं जगण कथन करून तुकाराम ज्या वाटेने गेले त्या वाटेने जाण्याचा निश्चय करते.

आवलीचा जीवनसंघर्ष पाहिला की आवलीचा संसारातील चिवटपणा, समजंसपणा दिसून येतो. ती संसारासाठी स्फुंदणारी आहे. नवऱ्याला प्रपंच्याकडे प्रवृत्त करणारी संकटावर दुप्पट आवेगाने कोसळणारी आहे. ती संसारासाठी अपार कष्ट करते तिची कष्टावर गाढ श्रद्धा आहे. ती जीवनात काही मूल्य बाळगून जगताना दिसते. तिचे कष्ट पुढील विधानातून स्पष्ट होते. 'कुणाची दळण दळून दे, कणाच पाणी भरून दे, कुणाला गोवऱ्या दे, कुणाच धान्य निवडायला, दिवस मावळला तरी तिची कामं संपायची नाहीत, पण कामाला भिणारी आवली नव्हतीच. चार घरी काम करून त्या घरच्या माणसांना धरून राहून आवली प्रपंच ओढत होती. तुकाराम बुवा मात्र भजन-कीर्तनात मग्न होते. जगाचा संस्कार करत होते. आवली एकटीच संसाराच्या खस्ता खात होती. त्यांचा संसार दोन समांतर पातळ्यांवर सुरू होता.' (पृष्ठ १३४)

आवली तुकारामांवर संसारासाठी राग करीत असली तरी तिची तुकारामांवर माया आहे. ती कुटुंब वत्सल आहे. तिला अन्याय सहन होताना दिसत नाही. म्हणूनच धर्मात ढवळाढवळ केली म्हणून धर्ममार्तंड तुकारामाला शिक्षा म्हणून त्यांच्या पोथ्या नदीत सोडतात त्या प्रसंगात आवली सोपान काकाना म्हणते, ''म्हणजे काय हो सोपानकाका?कसला अधिकार? आणि तो फक्त त्यांना कुणी दिलां? आणि त्या गोष्टी आपण का करायच्या नाहीत?''[४] (पृष्ठ १३५) यातून तिची संवेदनशीलता प्रकट होते. हीच आवली पुढे नकळत तुकारामांना संतपदाला पोहचवण्यात प्रोत्साहन देणारी आवली एक चैतन्याच रुप आहे.

**भाषाशैली:**

कादंबरीमध्ये भाषेला पर्यायाने विशिष्ट शैलीला अत्यंत महत्त्व आहे. भाषा हे साहित्याचे माध्यमआहे. लेखकाला आपल्या मनातील भावना, विचार, थोडक्यात पण मोठ्या

आशयाद्वारे मांडता आल्या पाहिजेत. त्यामुळेच प्रत्येक लेखकाची एक स्वतंत्र अशी शैली असते हे सांगताना भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''एखाद्या द्रव्याला विशिष्ट माध्यमाद्वारे विशिष्ट रुपामध्ये प्रकट करण्याकरीता वापरल्या जाणाऱ्या तंत्र समुच्चयाची पद्धती म्हणजे शैली होय.''[५] त्याचप्रमाणे कादंबरी एक वाङमय प्रकार या आपल्या ग्रंथात संत जान्हवी म्हणतात, ''भाषा ही कमवावी लागते व तीत सहजरम्यता असणे हे कार्य वाटते तितके सोपे नाही. भाषा शैली म्हणजे भाषेतील सोपेपणा होय.''[६]

'तुकयाची आवली' या कादंबरीतील भाषा निवेदन हे ग्रामीण वातावरणातील घरगुती पद्धतीने चित्रित केलेले आहे. मंजुश्री गोखले यांची भाषा शैली साधी सोपी आणि ओघवती आहे. त्यात कुठेही क्लिष्टता नाही. आवलीच्या जीवन संघर्षाचे स्पष्ट असे प्रतिबिंब उमटविण्याचा लेखिकेने प्रयत्न केला आहे. त्यांची भाषा बऱ्याच ठिकाणी निवेदन हे बोली भाषेतून प्रकटले आहे. त्यामुळे भाषेत जिवंतपणा आला आहे.

कादंबरीतील निवेदन आशयाला अधिक प्रसरणशील बनवते. लेखिका एखाद्या व्यक्तीचे हुबेहुब वर्णन करताना ती व्यक्ती डोळ्यासमोर उभी रहाते. तुकारामांचे वर्णन करताना लेखिका लिहिते, मध्यम बांध्याचा, निमगोऱ्या वर्णाचा तुकाराम स्वच्छ पांढरे धोतर, पांढराच सदरा, डोईवर पागोटे, तरतरीत नाक, अतिशय नितळ आणि प्रेमाचा वर्षाव करणारे स्निग्ध डोळे, निश्चयी स्वभाव दर्शविणाऱ्या जाडसर भुवया, चेहऱ्यावरच निर्व्याज हसू आणि प्रसन्न मुद्रा. (पृष्ठ ४२)

कादंबरीतील भाषा योग्य तो परिणाम साधताना दिसते. आवलीचा तुकारामांशी विवाह झाल्यानंतर एक प्रसंग लेखिकेने चित्रित केला आहे. 'वऱ्हाडाची परतायची वेळ झाली. लुगड्याच्या ओझ्यानं वाकलेली आवली मांडवातल्या एका कोपऱ्यात ओठंगून उभी होती. मूसमूसत होती. आई-आप्पाजी दुरावणार होते. मायेच माहेर परक होणार होत. मैत्रिणी लांबणार होत्या यालाच लग्न म्हणीत असतील का? (पृष्ठ ६३) या प्रसंगातून आवलीची बाल्यावस्था आणि तिच्या मनातील घालमेल मनाला हूरहूर लावणारी आहे. आवलीचे दु:ख, दारिद्रय, तिची धडपड इत्यादीचे चित्रण करताना त्यांची भाषा मनाचा ठाव घेते. तुकाराम महाराज व शिवाजी महाराज यांच्या भेटीतील प्रसंगात शिवाजी महाराज तुकारामांना भेटवस्तू देतात तुकाराम त्याचा स्वीकार करीत नाहीत तर आपलं दारिद्र्य असच राहणार या भावनेने



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

दु:खी कष्टी होताना जाणवते कादंबरीतील भाषा सर्वसामान्याना समजेल अशी आहे कादंबरीत योग्य त्या प्रतिमांचा, उपमांचा वापर केल्याचे दिसते.

आवली जात्यावर दळण दळायला बसल्यानंतर आपल्या माहेराविषयीची माया व्यक्त करताना म्हणते,

''माझ्या माहेराला बाई दह्या दुधाची पुरवाई ।।

माझी मायेची बाई। माझी मंगळाई।

माझं मायेचं माहेर। सोन्या-मोत्याचं झुंबर

माझं मायेच छप्पर। रूप्याच्या कौलाई ।।''

आवलीच्या माहेरावरील वर्णनातून आवलीच्या माहेराची श्रीमंती परिणामकारक साकार करण्यास भाषेतील प्रतिमा कशा साहाय्यभूत ठरल्या आहेत याचे प्रत्यंतर येते. त्याचप्रमाणे आवली दळण दळते तेव्हा जात्यातून पडणार पीठ आणि आवलीच मन हे प्रतिकात्मक रूपात व्यक्त केलं आहे. लेखिका लिहिते, 'जातं भराभर फिरत होतं त्याला घास भराभर मिळत होता आणि शुभ्र पांढरं पीठ बाहेर सांडत होतं. आवलीच्या नितळ, प्राजळ मनासारखं तिच्या स्वच्छ निर्मळ विचारांसारखं, तिच्या धवल, उज्ज्वल चारित्र्यासारखं' त्याचप्रमाणे आणखी काही उपमा आढळून येतात. उदा. गोल-गोल पातळ पांढऱ्या शुभ्र भाकरी, टम्म फुगलेल्या भाकरी त्याचप्रमाणे भाषेची वैशिष्ट्ये पहात असताना कादंबरीत, काही ठिकाणी भाषा अलंकारिक होताना आढळते. भाषा साधी असली तरी त्यातही सौंदर्य दडलेले आहे. याची जाणीव होते.

कादंबरीत भिवाचे व्यक्तिचित्रण करताना केलेली शब्दयोजना ही साजेशी आहे. आप्पाजी समोर तो सुतासारखा सरळ असायचा, आप्पाजी समोर भिवाएखाद्या कोकरासारखा उभा होता. दुष्काळानंतर आप्पाजी भेटायला येतात आणि तुकारामांना संसार करून भक्ती कराण्याचा सल्ला देतात व काही काम करण्यास सांगतात. तुकाराम या गोष्टीला होकार देताना आवलीला खूप आनंद होतो. हे सांगण्यासाठी केलेली शब्दयोजना म्हणजे 'तिचा जीव सुपाएवढा झाला, भाकरीला पाणी लावायचं सोडून वैलावर टाकलं चर्रर वाजल्यावर तिच्या लक्षात आलं, ती स्वत:शीच खूदकन हसली. प्रस्तुत कादंबरी ही चरित्रात्मक असल्याने अशा वाक्याचे प्रमाण कमी आहे. कादंबरीत आलेली वाक्ये अशी आहेत.'

'एका प्रचंड मोठ्या वटवृक्षाला आधार देणाऱ्या धरणीचं हे रूप आहे.'

'एखाद्या तपस्व्यासारखा विठोबा'

'स्वामीजींच्या त्या नजरेने जणू विझलेल्या निखाऱ्यावर फुंकर घातली.'

हनुवटीवरची, ठामपणा दर्शविणारी खळी पुन्हा गहिरी झाली.

हा आकाशाएवढा झालेला तुका तुझ्यासारखी धरणी टेकायला होती, म्हणून एवढा मोठा झाला.

आवलीचा हात किती खरखरीत होता. तिच्या रखरखीत नशिबासारखा!

तिला वाटलं, त्यांच्या हातात हात घालून आपण सप्तपदी चालतोय.

डोंगरावर जाऊन बसलेल्या आपल्या उपाशी नवऱ्याला काट्या- कुट्यातून अनवाणी चालत जेवण घेऊन जाणारी आवली कुठल्याही सावित्रीपेक्षा कमी नव्हती.

दळिता कांडिता । तुज गाईन अनंता ।

न विसरे क्षणभरी । तुझे नाम गा मुरारी ।

नित्य हा चि कारभार । मुखी हरी निरंतर ।

मायबाप बंधू बहिणी । तू बा सखा चक्रपाणि ।

लक्ष लागतसे चरणासि । म्हणे जनी नामयाची दासी ।।

प्रस्तुत पद्य चरणातून विठ्ठलाला मायबाप, बंधू, बहिणी, सखा, चक्रपाणि या सारख्या उपमा देऊन विठ्ठलास व्यक्त केले आहे.

## निवेदन पद्धती

निवेदन म्हणजे कथन निवेदनातून घटना प्रसंगामध्ये सुसंगती आणली जाते. घडलेल्या घटनांचे पात्रांचे त्यांच्या कृतींचे स्वभावाचे चित्रण केले जाते. संज्ञा-संकल्पना कोशामध्ये 'निवेदन म्हणजे घटनांची मालिका'[८] असे म्हटले आहे. तर निवेदनाविषयी गो. मा. पवार म्हणतात., निवेदन लेखकाने तृतीय पुरुषात व नागर भाषेत करणेचे अपरिहार्य वाटते. कारण निवेदक वर्ण्य व्यक्तीच्या वृत्तीचे वर्णन करताच त्याच्यावर एकप्रकारच्या मिश्किलपणाने भाष्य करीत असतानाचा सूर ही त्यात अनुस्यूत आहे. ग्रामीण भाषेत हे निवेदन केले तर मुळातील स्वरस्य व अर्थवता नाहीशी होईल.[९]



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

''निवेदनाच्या पद्धती प्रथम पुरुषी व तृतीय पुरुषी अशा असतात प्रथम पुरुषी पद्धतीत कथेतील कोणते तरी एक पात्र स्वत: होऊन सर्व हकिकत सांगत असते नायक किंवा नायिका यांच्यापैकी कोणाला तरी केंद्रस्थानी कल्पून त्यांच्याभोवती कादंबरीतील लहानसहान प्रसंगाची गुंफण केलेली असते. दुसऱ्यापद्धतीत लेखक त्रयस्थाची भूमिका स्वीकारून सर्व प्रसंग स्वत:वर्णन करून सांगत असतो.''[१०]

प्रस्तुत कादंबरीत तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीचा अवलंब केला आहे. कादंबरीतील निवेदन आशयाची अभिव्यक्तीची एकरूपता साधते. व्यक्तीच्या स्वभावातील गुंतागुत उलगडून दाखविण्यासाठी त्यांनी निवेदनाचा आधार घेतला आहे. त्यांच्या निवेदनातून आवली विषयीची सहानुभूती जाणवते. निवेदनातून घटनाप्रसंग पात्र वातावरण यांची निर्मिती होते.

आवलीचा विवाह झाल्यानंतर ती दोन वर्षांनी देहूला येते व घरकामात पारंगत हुशार होती. तिची कर्तव्यतत्परता पाहून बोल्होबा आपल्या घरातील सर्व सूत्रे आवलीच्या हाती देतात. त्यावेळी बोल्होबाच्या घरातील कामावर असलेल्या सईच्या नवऱ्याने सईला काळी आहे म्हणून टाकले होते. सर्वांनी प्रयत्न करूनही तो तिला ठेऊन घेण्यास नकार देतो अशा वेळी आवली आपण काही तरी करण्याचा प्रयत्न करते त्यासाठी तिला बोल्होबांची परवानगी घेणे इष्ट वाटते. म्हणून ती बोल्होबांना म्हणते, ''माणकूला मी दोन गोष्टी बोलून बघू का? आपली परवानगी अ्सेल तर ''[११] तिच्या निवेदनातून तिच्या नम्रपणाचेच दर्शन लेखिकेने घडविले आहे. त्याचप्रमाणे लालजी सावकार जेव्हा वाड्याची किंमतीचे कर्ज पूर्ण झाले तो वाड्यावर जप्ती आणतो तेव्हा आवली त्याला थांबविण्याचा प्रयत्न करते पण तो थांबत नाही हे पाहून मंदिरातून आलेल्या तुकारामांना आवली आंकाताने म्हणते, ''धनी अहो ऐकताय ना? तो सावकार आपल्याला, आपल्या मुलांना उघड्यावर टाकायला आलाय आपल्या हक्काच छप्पर काढून घेतोय. तुम्ही त्याला आडवा त्याला थांबवा काहीतरी बोला धनी, काही तरी करा''[१२] यातून आवलीची आपल्या घराविषयीची माया, कुटुंबवत्सलता हे गुण दिसतात.

तुकाराम महाराजांनी वेदातील ज्ञान सामान्य माणसाना दिले वेदाचे पठण करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मण लोकांना असताना तो अधिकार तुकारामांनी मोडला होता म्हणून त्याचा जाब विचारून तुकारामांवरील आरोप सिद्ध करण्यासाठी काशीहून रामेश्वर भट येतो. त्यावेळी वेगळीच कुजबूज चालू होते. आवलीला यातील काही नीट समजत नाही त्यावेळी

सोपानकाका आवलीला ब्राह्मण नाराज का आहेत ते सांगतात त्यावेळी आवली म्हणते ''म्हणजे काय हो सोपानकाका? कसला अधिकार? आणि तो फक्त त्यांना कुणी दिला? आणि त्या गोष्टी आपण का करायच्या नाहीत?''[१३] निवेदनातून अन्याय, अत्याचाराला विरोध करणारी आवलीची मानसिकता लेखिकेने यथातथ्य रेखाटली आहे.

तुकारामांच्या किर्तनाला गेल्यानंतर काशीबाई तुकारामांचा आपल्या पत्नी विषयी वापरलेले कर्कशा व भांडखोर हे शब्द ऐकून तिला वाईट वाटते तिला आवली विषयी सहानुभूती वाटते म्हणून ती म्हणते, ''आवले, तुझे हे काबाडकष्ट बुवांना दिसत नाहीत का ग? तू एवढी राबणूक करून कोंड्याचा मांडा करून संसार चालवतीयास ते त्यांना दिसत नाही का?''[१४] यावर न समजल्यासारखे आवलीने केल्यानंतर काशीबाई तिला समजावून सांगते. ''आवले तुझी राबणूक ध्यानी न घेता बुवा तुझा भांडखोर स्वभाव अभंगातून सांगतात बघ''[१५] या तिच्या निवेदनातून आवलीविषयीची स्त्री सुलभ भावना व सहानुभूती निर्दिष्ट केली आहे.

कादंबरीत काही ठिकाणी लेखिकेने वास्तू विषयक निवेदन केले आहे ते असे आहे. स्वयंपाकघर तांब्या-पितळेच्या भांड्यानी भरलं होतं. कोपऱ्यात मोठ्याल्या हंड्यापासून छोट्या तपेली-सतेली पर्यंत हंड्याची उतरंड दिसत होती. संगळी भांडी कशी लख्ख, त्यात बघून कुंकू लावावी इतकी चकचकीत. आग्नेय कोपऱ्यात चार चूली होत्या. दोन मोठ्या, दोन लहान चुलीभोवती चांगल ऐसपैस कट्टा होता. चुलीच्या मागे भिंतीत अंबर दिसत होता. त्यात लाकूडफाटा भरलेला होता. स्वयंपाकघराच्या ऐसपैस आकारावरूनच इथं कायम पंगती उठत असणार हे लक्षात येत होतं.या निवेदनातून तुकारामांच्या घरची समृद्धी लेखिकेने स्पष्ट करून तेथील वास्तवता दृष्टीस आणली आहे.

या कादंबरीतील वैविध्यपूर्ण निवेदनाप्रमाणे म्हणी व शिव्या देखिल आल्या आहेत.आवलीचे संसारातील कष्ट पाहून काशीबाई म्हणते, कोंड्याचा मांडा करून संसार चालवतीयास हे त्यांना दिसत नाही. तसेच आवलीच्या भांडखोर स्वभावाबाबत तुकारामांनी सांगितलेल्या अभंग ऐकून काशीबाई म्हणते, ''हे नवरे मेले सगळे इथून तिथून सारखेच बघ. बायकोच्या डोळ्यातील कुसळ दिसतया यास्नी पन सोताच्या डोळ्यातलं मुसळ दिसत नाही. साप म्हणून नये, धाकला आणि नवरा म्हणू नये आपला.'' यासारख्या म्हणी येताना दिसतात.

आवलीने विठ्ठलाला आपला क्रोध व्यक्त करण्यासाठी नेहमीच शिव्या देताना आढळते ती त्याला काळ्या, काळतोंड्या, मेल्या अशा शब्दात संबोधताना आढळते. यातून आवलीचा भावानुभव व्यापक व सखोल होतो.

**लोकजीवन**

व्यक्ती आणि समाज यांचे संबंध द्वंदात्मक असतात. व्यक्तीशिवाय समाजाचे अस्तित्व असू शकत नाही आणि समाजाशिवाय व्यक्तीलाही अस्तित्व प्राप्त होऊ शकत नाही. आणि समाजानेच व्यक्तीचे अस्तित्व सिद्ध होते. असे हे व्यक्ती आणि समाज यांचे नाते परस्परावलंबी आहे.

'तुकयाची आवली' या चरित्रात्मक कादंबरीतून तुकारामांच्या काळातील समाजाचे दर्शन याच पद्धतीने होते. मात्र ते तुटक-तुटक पद्धतीने होते. त्यातून त्यांच्या समाजजीवनाचा अंदाज येऊ शकतो. समाजात बहुजन समाज म्हणजे बारा-बलुतेदार यांचा समावेश आहे. कोणत्याही समाजात सधन, निर्धन असे लोक असतात. निर्धन लोक आपले जीवन व्यतीत करीत असतात. त्याचप्रमाणे येथील गरीब लोक काही सधन प्रतिष्ठांतिच्या घरी घरकाम करून आपला चरितार्थ चालवतात. येथील गरीब माणसे एकोप्याने, जिव्हाळ्याने, प्रामाणिकपणे वागून कष्ट करणारी आहेत. त्याचप्रमाणे व्यापार, व्यवसाय करून नेटका प्रपंच करून चार पैसे गाठीशी राखून असलेली प्रतिष्ठित सधन माणसे म्हणजे आवलीचे वडील आप्पाजी गुळवे, बोल्होबा आंबिले- मोरे, बाळाजी शेतकरी यासारखी सज्जन माणसेही आढळतात. ही माणसे काहीना काही काम करीत असतात.त्याचप्रमाणे, सावकारी हा पेशा असणारी लालजी सावकारासारखी माणसेही आहेत. त्यांचा व्यवसाय म्हणजे नाडलेल्या माणसांना कर्ज देणे व त्या बदलात वस्तू गहाण ठेवून घेणे. कर्जाची परतफेड न झाल्यास गहाणवस्तूचा कब्जा घेणे हा व्यवसाय करणारी निष्ठूर माणसांचेही दर्शन कादंबरीत घडून येते. एकंदरीत कादंबरीतील समाजजीवन संमिश्र स्वरूपाचे आहे.

मंजुश्री गोखले यांनी चित्रित केलेली कादंबरीतील गरीब कष्टकरी माणसे सोशिक निर्व्याज, निष्पाप आहेत. त्यांच्या जीवनात कष्ट, दारिद्र्य असले तरी ती रसरशीत आहेत.अशा व्यक्तींना आप्पाजी व बोल्होबा सारखी सधन माणसे प्रेमाचा व मायेचा आधार देऊन आपल्या घरी काही कामानिमित्त ठेऊन घेणारी आहेत. ही माणसेही आपपर हा भाव न

ठेवता आपल्याच घरचे काम समजून कष्ट करणारी आहेत. गुणाबाई व सई यांना आवलीची आई व कनकाई आपल्या कुटुंबाचाच घटक मानताना दिसतात. तर या स्त्रिया सकाळ ते संध्याकाळ पडेल ती कामे आनंदाने करतात. या माणसांच्या जीवनातील हेवेदावे यांच्या न्यायनिवाडा करण्याचे काम गावातील प्रतिष्ठितांच्या कडूनच केला जातो. प्रतिष्ठित जो न्याय देतील तो न्याय प्रमाण व योग्य मानणारी ही गरीब माणसे आहेत. भिवा रामोशी शिव रामोशी हे सख्खे भाऊ त्यांचे घरच्या वाटणीवरून भांडण लागल्यानंतर प्रसंग काठ्या-कुऱ्हाडीपर्यंत जातो. पण न्यायनिवाड्यासाठी किंवा समजूत काढण्यसाठी भिवा रामोशाला आप्पाजी बोलावून घेतात. तेव्हा आप्पाजींनी समजावल्या नंतर तो फक्त 'व्हय जी' एवढेच म्हणतो. त्याची त्यावेळी अवस्था एखाद्या कोकराप्रमाणे होते. अशी भोळी भाबडी माणसे दिसून येतात.

'राऊ हा गुरव आहे त्याचे मन विठ्ठलभक्तीकडे ओढले जातो. त्यासाठी तो गाव सोडतो. पण आप्पाजी समजूत काढताच तो गावातील मंदिरात पुजारी म्हणून काम करतो. कष्टाबरोबर भक्तीलाही जवळ करणारी ही माणसे आहेत. काही लोक संसार करून भक्ती करतात तर तुकारामांसारख्याना संसार असार वाटतो असे हे भक्तीचे अपार प्रेम समाजात आढळते.'

तुकारामकालीन समाज जीवनात समाजावर दुष्काळाचे सावट वारंवार येते. त्यामुळे गरीब कुटुंबात अन्न वस्त्रांची भ्रात असते. खुद्द तुकाराम महाराजांचे संपूर्ण कुटुंब या दुष्काळाने उध्वस्त होते. संपूर्ण समाजात रोगराई पसरते ही नैसर्गिक शक्ती इतकी अफाट आहे की, त्यामुळे तुकारामांसारखी माणसे पिचून जातात तर काही माणसे चिवटपणे झुंज देताना दिसतात ती संकटात एकमेकांना मदत करतात माणकू हा गावातील सामान्य माणूस पण तुकारामांच्या कुटुंबाला आपले घर उदार मनाने देताना दिसतो. येथे समाजाची सामाजिक बांधिलकी हा गुण प्रकर्षाने जाणवतो. येथे आवलीसारख्या कर्तव्यनिष्ठ व ध्येयनिष्ठ स्त्रीयांचे दर्शन घडून येते. त्यांच्या प्रयत्नांवर विश्वास आहे. तुकारामांसारखी देवभोळी पापभीरू माणसे दु:खानी खचणारी आहेत. तर त्याच ताकदीने प्रतिकार करणारे आवली सारखे व्यक्तित्व ही कादंबरीतून चित्रित होते. येथे माणसे जशी कर्तव्यनिष्ठ, ध्येयनिष्ठ जशी आहेत तशीच भोंदूगीरी, चोरी, वाटमारी मशा उपद्रवी माणसांचाही त्रास होताना दिसतो. पण असे प्रकार अपवादानेच होताना आढळतात.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

या काळातील समाजातील बहुतांशी लोक श्रद्धा, श्रम आणि भक्ती यांनी भारलेली आहेत. विठ्ठलाचे भजन कीर्तन या बरोबर गावातील सार्वजनिक कार्यक्रमात उत्साहपूर्वक भाग घेताना दिसतात. मंदिर बांधणीच्यावेळी गावातील अबालवृद्ध झटतात. यातून तेथील एकता प्रकर्षाने जाणवते. तसेच गावात भजन कीर्तनासारखा कार्यक्रम कोठेही असो पुरुषच काय तर स्त्रीयां देखिल भक्तीभावाने जाताना दिसताता. या समाजात सर्व सण एकोप्याने एकात्मयेच्या भावनेने साजरे केले जातात.

या काळातील विवाहाची पद्धती बालजरठ विवाह पद्धत आहे. तत्कालिन रूढीप्रमाणे मुला-मुलींच्या वयात खूप अंतर असणे आठ वर्ष वयाच्या आवलीचा विवाह बिजवर व एक मुलगा असणाऱ्या तुकारामांशी केला जातो. लग्न ठरविताना स्त्रियांचे विचार फारसे विचारात घेतले जात नाहीत. मात्र मुलगा-मुलगी पहाणे साखरपुडा करणे, विवाह मुलाच्या घरी रूखवत, फराळाचे जिन्नस, शिधा, आहेर, दागिने देणे या आजच्या प्रचलित पद्धती त्याहीकाळात दिसून येतात. हळद लावणे, उष्टी हळद नवरीला लावणे, हळदीचा आहेर नंतर जेवणावळ, संध्याकाळी वरपूजा, वरपूजानंतर त्याला सन्मानाने चौरंगावर बसवून शंभर दिव्यानी ओवाळले जाते. आवली-तुकारामांचा विवाह याच पद्धतीने साजरा होतो. या काळात लग्नात पाटील-कुलकर्णी मंडळीचा मानपान केला जातो. सनई-चौघड्यांच्या सूरात मंगल अक्षता टाकल्या जातात. मुलीला बीजवर मुलाला दिल्यास मंगळसूत्राबरोबर सवतीचा टाक बांधला जातो. मुलगी लहान असल्यास ती वयात येईपर्यंत तिच्या माहेरी ठेवण्याची प्रथा दिसून येते.

सामाजिक न्यायनिवाडा हा प्राथमिक स्वरूपात काही प्रतिष्ठित अनुभवी लोकांकडून केला जातो. राऊ, भिवा रामोशी, सारजा यांच्या वैयक्तिक कलहात आप्पाजी सारख्या माणसांकडून समजूत घातली जाते. तेव्हा ही माणसे मुकाट्याने दिलेला न्याय मान्य करताना दिसतात ती नम्र व सहनशील वृत्तीची दिसून येतात. मात्र याच काळात ब्राह्मण वर्गाचा पगडा कनिष्ठ वर्गावर जास्त असल्याचे दिसून येते.

ब्राह्मण समाज हा धर्मनिष्ठ आहे. त्यांना आपल्या धर्मात कोणी ढवळाढवळ केली तर त्यांना मान्य होत नाही. ते न्यायनिष्ठूर होताना आढळतात. तुकारामांसारख्या सताने वेदातील ज्ञान सर्वसामान्य लोकांना दिले याबद्दल ते चिडून होते. गावात, समाजात एकप्रकारचा ते

दबदबा निर्माण करताना दिसतात. तुकारामांनी कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना वेदातील ज्ञान दिले यावेळी भीतीपोटी गावात एक वेगळच वातावरण निर्माण होते. सर्वत्र कुजबूज सुरू होते. त्यावेळी आवली आपल्या काही नीट कळत नाही म्हणून ती विचारते तेव्हा ही साधी सरळ मनाची माणसे केवळ भीती पोटी आपलेच चुकले अशी समजूत करून घेतात.

म्हणून गावात रहायच असेल तर गावाप्रमाण वागावं लागतं गावाच्या विरूद्ध वागून चालत नाही.अशी त्यांची मानसिकता तयार होताना दिसते. तुकारामांच्या गुन्ह्याबद्दल त्यांच्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीत सोडल्या जातात. तेव्हा संपूर्ण गाव नदीकाठी जमतो. पण रामेश्वर भटासाख्या धर्ममार्तंडाला विरोध करण्याचे धाडस या गरीब सालस समाजात दिसून येत नाही. यावरून शोषण करणारा व सोशीत समाजाचे चित्रण घडून येते.

ब्राह्मण समाज धर्ममार्तंड आहे पण सर्वसामान्य माणसे धार्मिक वृत्तीची आहेत. त्यांच्यातील माणूसकीचे दर्शन प्रकर्षाने जाणवते. ती श्रद्धाळू, अध्यात्मवृत्तीची, परोपकारी वृत्तीची दिसून येतात. बोल्होबा आपल्या घरी पंगतीला दररोज कुणी ना कुणी वारकरी, कीर्तनकार किंवा साधू संन्याशी यांना जेवू खावू घालतात. तर धार्मिक वृत्तीची कनकाई पतीचा वारसा तसाच पुढे चालू ठेवताना दिसते.

प्रस्तुत कादंबरीत ताप, सर्दी, दमा यासरख्या आजारांचा उल्लेख येताना दिसतो. त्यावर उपाय म्हणून वैदू, हकीम, वैद्य यांच्याकडून औषधाच्या मात्रा म्हणून वनस्पतींचा काड्याच्या स्वरूपात औषधोपचार केला जातो. त्यामध्ये तुळस, सुंठ, यांचा रस दूधात घालून देणे. जखमेवरती दगडीपाला चोळणे यासारखे उपाय केले जातात.

तुकयाची आवली या कादंबरीतील भाग हा पुणे, देहू, लेह, पंढरपूर व कानडी मुलूखाचा उल्लेख येतो. या भागात चालणारे व्यवसाय म्हणजेव्यापार करणे, सावकारी करणे, शेती करणे, जनावरे पाळणे, वैदकीकरणे, बलुतेदारांकडून परगावची निरोपाची कामे करणे, सरकारी दरबारी कामे करणे, पीक राखणे, गुरव म्हणून गावातील मंदिराची देखभाल करणे, पूजा करणे, स्त्रीया दुसऱ्याच्या म्हणजेच प्रतिष्ठितांच्या घरी दळण दळून देणे, पाणी भरणे, गोवऱ्या देणे, धान्य निवडणे, यासरखी घरकामे करतात.

या काळात येणारी पिके म्हणजे भात, ज्वारी, ऊस, कडधान्य, मिरची, हळद, सुपारी, इत्यादींचा उल्लेख आलेला आहे. जेवणात भात,भाकरी, कोरड्यास, कूरडूची भाजी, पुरण -

पोळी, गूळवणी, मिरचीचा ठेचा, दूध, दही, तुप, मोदक, पोहे, गूळ, साखर, पेढे, लाह्या, चुरमुऱ्याचे लाडू, रव्याचे लाडू, केळी, बत्तासे, दशम्या, शिरा इत्यादी खाद्य पदार्थ आढळतात. तसेच मानपान यासाठी पान, सुपारी, यांचा विडा, हळद, कुंकू, अबीर बुका यांचाही उल्लेख येतो.

वस्त्रांच्या बाबतीत धोतर, सदरा पगडी, बाराबंदी, पागोटे, टापशी, पितांबर हे पुरुषाचे पोशाख तर चोळी, परकर, टोपपदरी इरकली, जरतारी लुगडी, पोलके खणाचे परकर ही स्त्रीयांसाठीची वस्त्रे आहेत. दागिन्यांच्या संदर्भात पैंजण, बांगड्या, गळसरी, डूल, कमरपट्टा, नथनी, इत्यादी आभूषणे दिसून येतात.

तुकारामांच्या काळातील शिक्षण पद्धती ही रूढ अर्थाने ज्याला आपण शिक्षण म्हणतो तशी अस्तित्वात नसल्याचे दिसून येते. शिक्षण हे केवळ व्यवहारापुरतेच मर्यादित होते.

**कल्पना विलास**

कादंबरीमध्ये घटना, पात्रे यांचे विचार सुख:दु:खे या साऱ्या मनोव्यापाराचे चित्रण केलेले आहे. प्रत्येक प्रसंगात प्रस्तुत कादंबरी मध्ये आवली तुकारामांच्या जीवन संघर्षात विठ्ठलाच्या मनामध्ये कोणते विचार आले हे पहाण्यासाठी विठ्ठल-रखुमाई जिवंत पात्रे बनताता. रखुमाई अडाणी, अबोध, तर विठ्ठल हा ज्ञानी तज्ञ आहे. प्रत्येक प्रसंग हा भावलीच्या भावविश्वातून उलगडलेला आहे आणि प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी आलेला विठ्ठल- रक्मिणीचा संवाद किंवा मनोगत हे आवलीच्या त्या त्या प्रकरणातील जीवनलेखावर एक विशेष टिप्पणीकार (एक्स्पर्ट कॉमेंट्रेटर) या भूमिकेतून आलेले आहे. कारण संत तुकारामांच्या जीवनात आवलीचे स्थान, विठ्ठलाचं स्थान या व्यतिरिक्त तिसऱ्या स्थानाला जागा नाही. लेखिकेने विठ्ठल - रखुमाईला देवत्वरूप विसरून मनुष्यत्व रूप बहाल केले आहे. अशा कल्पना विलासात करून विठ्ठल - रूक्मिणीची भूमिका महत्त्वाची ठेवली आहे.

आवलीला गावात विठ्ठलाचं मंदिर बांधल जाते ही गोष्टच मुळी पसंत नव्हती. मात्र मोठ्या लोकांच्या विचारासमोर त्या परकरी मुलीचे विचार मान्य होण्यासारखे नाहीत म्हणून माघार घेणाऱ्या आवलीला खेळात रमताना पाहून विठ्ठलाच्या आनंदाला पारावार राहत नाही. असा कल्पना विलास करून विठ्ठल व तुकाराम यांच्या भक्तीचा पाया घालण्याचे काम केले आहे.तर आवली- तुकारामांच्या विवाहाने तुकाराम संतपदाच्या शिखरापर्यंत पोहचण्यासाठी

जिचा भक्कम आधार होता त्या आवलीच्या भक्ती ऐवजी शिव्या-शाप ऐकावे लागणार होते हे माहित असूनही विठ्ठल प्रसन्न कसा याचे कोडे रूक्मिणीला पडलेले आहे. कारण आवलीच्या सुख-दु:खाचा भागीदार, संघर्षातला तिचा जोडीदार, तिच सुखनिधान म्हणजे तुकाराम आणि त्याच तुकारामांना आपलंस करण्याचा विठ्ठलाचा एवढा हट्ट का या प्रश्नाच उत्तर रूक्मिणीला ही सापडत नाही.

आवली परिस्थितीशी झुंज घेत संसारासाठी खस्ता काढते. तुकाराम मात्र विठ्ठलाच्या भक्तीत इतके लिन होतात की, मुलांच्या पोटा-पाण्यासाठी वाड्यावर कर्ज होऊन तो सावकाराच्या ताब्यात जातो. अशावेळी डोक्यावरील छप्पर हरपलेली आवली तुकारामांच्या सांगण्यावरून विठ्ठलाच्या मंदिरात येते तेव्हा विठ्ठल कधीही न हारणाऱ्या आवलीला म्हणतो, 'आलीस की नाही शेवटी माझ्या आश्रयाला असे' म्हणून हसतोय असाच तिला भास होते. तर खोडसाळ हसणाऱ्या विठ्ठलाला पाहून आवलीच्या संतापाच्या उद्रेक होतो.

संतापाच्या भरात शिव्या देणारी आवली आपल्या आजारी मुलास घेऊन जेव्हा मंदिरात येते. तेव्हा फणकाऱ्याने येते. आज काही खैर नव्हते. आज चप्पलेचा मार बसणार होता. अशा वेळी स्वत: विठ्ठल आदिमाया रूक्मिणीचा धावा करतो. कारण एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीची वेदना, मनोव्यथा जाणू शकते. हे त्याला आज समजल होतं. अशावेळी तो इवलंस तोंड करून शांत बसतो.अशी येथे लेखिकेने कल्पना केली आहे.

कादंबरीत योगायोग, स्वप्न या सारख्या घटनांचा उल्लेख करून लेखिकेने कल्पनेच्या आधारे प्रसंगरेखाटन केले आहे. तुकारामांच्या अंभगाच्या वह्या इंद्रायणीत बुडविल्यानंतर रामेश्वरभटाच्या अंगाचा दाह होतो तेव्हा तुकाराम त्याच्या अंगाला ओली माती लावतात व त्याचा दाह कमी करतात ही त्यांची योग्यता साऱ्या गावाला पटते. या प्रसंगाने भौतिक संसारातून दूर जावून विठ्ठलाच्या जवळ जातात पण या संघर्षात आवलीची होणारी कुतरओढ तिची होणारी अपेक्षा तिच्या शेवटच्या श्वासापर्यंत संपणार की काय अशी रूक्मिणीची समजूत होताना दिसते.

तुकारामांचा मोठेपणा पाहून भेटण्यासाठी आलेले शिवाजी महाराज म्हणजे विठ्ठल शिवाजी महाराजांच्या रूपात तुकारामांचा द्रव्यावरील मोह आजमावून परीक्षा घेणाऱ्या विठ्ठलाच्या कसोटीस तुकाराम पूर्णपणे उतरताना तर आत्महत्या करावयास गेलेल्या आवलीला


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

संसारातील जबाबदारीची जाणीव करून देणारे स्वामी, तुकाराम महाराजंच्या गैरहजेरीत आवलीची सेवा करणारा प्रत्यक्ष विठ्ठल म्हणजे पंढरीनाथ यादव अशा अनेक मानवी भूमिकेत प्रकट होऊन तुकारामांचा संसार स्वत: सांभाळून तुकारामांनी परमार्थ निर्विघ्नपणे करावा म्हणून मदत करणाऱ्या विठ्ठलाला अनेक रूपात व्यक्त करून लेखिकेने रम्य कल्पना विलासाची मांडणी करून आवलीचे संसारातील कष्ट तिच्यावर होणारा अन्याय, स्पष्ट करण्यासाठी तिची मनोव्यथा शब्दबद्ध करण्यासाठी कल्पकता योजिली आहे.

**व्यक्तिचित्रण**

कादंबरीमध्ये व्यक्तिरेखा अथवा पात्र या घटकाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. व्यक्तिचित्रण विषयी म. सु. पाटील म्हणतात, ''पात्रात म्हणजे भांड्यात ज्याप्रमाणे आपण एखादा पदार्थ ठेवतो. त्याप्रमाणे या पात्रात कलावंत आपली चित्तवृत्तीरूप जाणीव विशिष्ट करतो ही कलावंताच्या जाणिवेची वाहक बनतात. त्यांचे सदृश्य लौकिकातील माणसांशी असते. परंतु ते आभ्यासात्मक असते. सुसान लँकर अशा निर्मितीला apparition हा अर्थपूर्ण शब्द वापरते. त्यांचे अस्तित्व इंद्रधनुष्यासारखे किंवा मृगजळासारेख भासते. या गोष्टी जशा मूर्त असतात, सत्य असतात. तरी स्पर्शातीत असतात. त्याचप्रमाणे कलासृष्टीतील पात्रे ही मूर्त असली सत्य असली तरी त्याचे स्वरूप काहीसे वाजवी असते. त्यांना आपण भावू शकतो तरी लौकिकातील व्यक्तीप्रमाणे स्पर्शू शकत नाही. त्यांच्याशी बोलणे वा त्यांच्या कृतीउक्तींचे स्पष्टीकरण त्यांच्याकडे मागणे शक्य नसते. कारण त्यांच्या कृतीउक्तीही आभासात्मक असतात. अशा पात्रांनी साहित्याचा प्रांत गजबजलेला असतो. त्यांच्याद्वारेच साहित्यिक मानवी जीवनाचे दर्शन घडवित असतो. मानवी स्वभावाचे विविध पैलू प्रत्ययाला आणून देत असतो.''[१७]

यावरून साहित्यकृतीतील व्यक्तींना पात्रे का म्हटले जाते हे दिसून येते. ही पात्रे मानवीजीवनाचे स्वभावाचे दर्शन घडवित असतात.

मंजुश्री गोखले यांनी तुकयाची आवली या चरित्रात्मक कादंबरीतून आवलीच्या जीवनसंघर्षाचे चित्रण केले आहे. विठ्ठलभक्तीत रममान झालेले तुकाराम आणि संसाराच्या मायापाशात अडकून गेलेली आवली यांच्या जीवनावर कादंबरीचे कथानक आहे.या कादंबरीमधील प्रमुख व्यक्तिरेखा आवली व तुकाराम असून बाकीसर्व गौण पात्रे आहेत. यात

येणारी पात्रे ही सत्प्रवृत्तीची तर अभावाने रामेश्वर भटासारखी दुष्ट प्रवृत्तीची व्यक्तिरेखा आहे. आवली लहानपणी सालस, पण थोडीशी हट्टी असणारी पुढे पुढे संसाराच्या ओझ्याखाली पिचून जाते. आवलीवर नितांत प्रेम करणारे तिचे आई-वडिल व त्यानंतर लग्न होऊन मिळालेले सासू-सासरे कनकाई व बोल्होबा यांच्यात ती फरक करीत नाही. बोल्होबा तर तिला प्रत्यक्ष आप्पाजीच वाटतात. त्यामुळे तिला सासरी फारसे जड जाताना दिसत मात्र कनकाई व बोल्होबा यांच्या मृत्युने तिच्या संसाराला ग्रहण लागते. तिचे बालपण संपून प्रौढपण प्राप्त होते. प्रथम तिला संसारात तुकारामांची साथ मिळाली पण जीवनातील अनेक संकटाचे आघात होऊ लागल्यानंतर तुकाराम विठ्ठलभक्तीकडे वळले पण संसाराची होणारी वाताहत पाहून आवली त्यांना विठ्ठलभक्ती पासून परावृत्त करून संसाराकडे वळविण्याचा प्रयत्न करते. ती शहाणपणाच्या गोष्टी सांगते. ती प्रयत्नवादी, ध्येयनिष्ठ जीवनात काही मूल्ये बाळगणारी आहे. परंतु विठ्ठलभक्तींकडे ओढलेगेलेल्या तुकारामांना ती सात्विक संतापाने फैलावर घेते. तिची ओढ संसाराकडे आहे. म्हणूनच तुकारामांच्या खचलेपणामळेच ती कर्तव्यसंपन्न झाली आहे. ती प्रौढ व प्रगल्भ झाली आहे.परिस्थितीपुढं नमत न घेता संकटावर मात करण्यासाठी तिची वृत्ती आहे. ती कष्टाळू, मायाळू, सहनशील, कुटुंबवत्सल आहे. ज्या विठ्ठलामुळे आपल्या संसाराची वाताहत झाली त्या विठ्ठलाला शिव्याशाप देणारी आवली कादंबरीत वारंवार भेटते.

तुकारामांवर आवलीचा राग असला तरी तिचे त्यांच्यावर प्रेम आहे. घराच्या जप्तीप्रसंगात आवली जेव्हा दुखावेगाने रडते व बघावयास येणाऱ्या लोकांना पिटाळते व माझा नवरा कसाही असला तरी तो माझा आहे. हे तिचे शब्द तुकारामांवरील प्रेम, माया दृगोच्चर करतात. कादंबरीत तिची विविध रूपे प्रकट झाली आहेत. यावरून तिचे स्त्रीत्व किती संपन्न आहे याची प्रचिती येते.

तुकारामांच्या मृत्युनंतर ती सैरभैर होते. ते केव्हा ना केव्हा तरी येतील या वेड्या अपेक्षेने स्वत:ला आवर घालते व त्याच अपेक्षेने नेहमी मंदिरात जाते. पण विठ्ठलाच्या मूर्तीच्या रूपात तिला तुकाराम भेटतात तेव्हा तिच्या मनाची तगमग शब्दातीत आहे. तिचे मन बारा वाटानी धावू पहाते व शेवटी समाधानाने पतीची इच्छा व मार्ग स्वीकारताना दिसते.

अशाप्रमारे आवलीच्या रूपाने तिच्या पात्रचित्रणातून भारतीय हिंदू स्त्रीचा एक आदर्श नमुना मंजुश्री गोखले यांनी तिच्या स्वभाव वैशिष्ट्यांसह वाचकांसमोर ठेवला आहे.

कादंबरीत येणारे दुसरे प्रमुख पात्र म्हणजे तुकाराम महाराज धार्मिक वृत्तीच्या घरी जन्मलेले तुकाराम सालस, सरळ स्वभावाचे पापभीरू, संघर्षापासून दूर असणारे तुकाराम जीवनातील अनेक आघातानी हतबल होताना वैयक्तिक व सामाजिक दु:खानी निराश झालेले तुकाराम विठ्ठल भक्तीतून सामाजावर नीतीमुल्याची आठवण करून देण्यासाठी भक्तीचा मार्ग स्वीकारतात. आवलीने त्यांना संसारात ओढण्याचा प्रयत्न केला पण ते आपल्या निश्चयापासून ढळताना दिसत नाहीत. यातून त्यांच्या निश्चियीवृत्तीचे दर्शन घडते. त्यांना भौतिक सुखाची आस नाही त्यातून त्यांची निर्लोभी वृत्तीचा प्रत्यय येतो. असे असले तरी आपल्या कुटुंबावर, पत्नीवर प्रेम आहे. आवलीला ते भोळ्या भाबड्या प्रतिमेत पहाताना दिसतात. त्यांची विठ्ठलावर गाढ श्रद्धा असल्याने जीवनात येणाऱ्या संकटाला ते सामोरे जातात. अधमकृत्य करणाऱ्या रामेश्वर भटांसारख्या लोकांना ते क्षमा करतात. त्यातून त्यांच्या अंगी दया, क्षमा, शांती होती म्हणूनच ते अणू एवढ्यारूपापासून आकाशाएवढे होताना दिसतात.

कादंबरीत येणारी गौण पात्रे म्हणजे आप्पाजी, बोल्होबा, आवली आई, कनकाई ही पात्रे धार्मिक सत्शील प्रवृत्तीची आहेत. माणूसकीच्या नात्याने वागणारी त्यांची वृत्ती आहे. त्याशिवाय गुण बाई, सारजा, राऊ, माणकू, सई, काशीबाई ही पात्रे कृतज्ञतेने जगणारी आहेत. त्यांच्या मनात आप-पर दृष्ट भावना स्पर्शही करीत नाही. आपल्यापरीने आपल्या उपकारकर्त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करताना दिसतात ती प्रेमळ सात्विक वृत्तीची आहेत.आपल्या शेतातील पीक नष्ट झाल्यावर बाळाजी सावकार सारखा शेतकरी उरलेले पीक कापल्यावर जास्तीचे धान्य तुकारामांना देत. त्याला तुकारामांचा सज्जनपणा माहिती असल्याने तो हे प्रामाणिकपणे व उदारपूर्वक धान्य देताना दिसतो. तर सुंदरामावशी आवलीच्या आजारपणात तिच्या कुटुंबाची काळजी घेते. त्याचप्रमाणे काशीबाई आपल्या स्त्रीसुलभ भावनेने एक स्त्रीच दु:ख जाणणारी आहे. तुकारामांनी कीर्तनातून आपल्या बायकोला 'कर्कशा' म्हटले ही गोष्ट तिच्या मनाला लागते व त्याही काळात आपल्या पत्नीला जे काय म्हणावे ते चारचौघात न म्हणता आपल्या घरी म्हणावे असे म्हणताना दिसते यातून तिच्या


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मनातील आवली विषयीचे प्रेम व अनुकंपा याचे दर्शन घडते. तसेच कांबरीत येणारे अल्प प्रमाणातील पात्र म्हणजे रुक्मिणी ही म्हणजे तुकारामांची पहिली पत्नी ती आपला संसार मुलगा व मुख्य म्हणजे पती तुकाराम हे एकाकी होऊ नयेत. म्हणून तुकारामांना दुसरे लग्न करण्याचा आग्रह करते आपल्या जीवंतपणी पतीला संसार करावयास लावणारी एका सत्‌शील स्त्रीचे रूप तिच्या व्यक्तित्ववातून प्रकट होते.

कादंबरीत येणारी इतरपात्रे ही प्रसंगानुरूप आलेली आहेत. त्यांचीही वैशिष्ट्ये लेखिकेने अल्पप्रमाणात व्यक्त केली आहेत.

कादंबरीत येणारी विठ्ठल व रूक्मिणी ही दोन पात्रे आपले देवत्व रूप विसरून मानवी रूपात प्रकटलेली आहेत. आवली तुकारामांच्या प्रत्येक वेळेच्या जीवनातील बऱ्या वाईट प्रसंगात ती आपल्या मनातील भाव बोलताना दिसतात.

**संघर्ष :**

कादंबरीत चित्रित झालेला संघर्ष हा लौकिक आणि अलौकिक स्वरूपाचा आहे. कादंबरीची मुख्य व्यक्तिरेखा म्हणजे आवली हिचा संघर्ष संपूर्ण आयुष्याला पुरुन उरला आहे. तो संघर्ष वास्तवातील संसाराशी आहे. तर तुकारामांचा संघर्ष हा विठ्ठलाच्या प्राप्तीसाठी चालले अध्यात्मिक स्वरूपाचे युद्ध आहेच त्याशिवाय त्यांचा संघर्ष हा बाह्यजगाशी देखील आहे.हा त्यांचा संघर्ष मानवी जीवनविषयक मूल्ये व विवेक यांच्यात होता. त्यांनी अध्यात्मिक संघर्षातून सर्वस्वपणाला लावून धर्माला नीतीचे आणि निष्कपट भावनेचे अधिष्ठान देऊन सांस्कृतिक व सामाजिक अन्यायाच्या विरोधात संघर्ष करावा लागला आहे.

तुकारामांना आधार देणारी घरातील सर्व वडिलधारी माणसे एकापाठोपाठ निघून गेली. त्यात पत्नीही गेली महाराष्ट्रातील भयानक दुष्काळ, लोकांची, दैनावस्था शिवाय स्वतःच्या मुलाचा मृत्यू या घटनांनी सैरभैर झालेल्या तुकारामांनी ईश्वराच्या प्राप्तीसाठी त्यांनी आपले सर्वस्वपणाला लावले ते उत्कटतेने विठ्ठलाकडे वळले. परिणामी संपूर्ण संसाराची जबाबदारी आवली हिच्यावर आल्याने जीवनातील प्रत्येक संकटात तिला एक हाती झुंज द्यावी लागते. हा संघर्ष केवळ, मुलांसाठी संसारासाठी तुकारामांना विठ्ठलापासून तुकारामांनी परावृत्त होऊन सर्वसामान्य माणसांसारखा आपला संसार असावा मुलांना दोनवेळेच किमान पोटभर खायला मिळावे, एवढीच माफक इच्छा असणारी आवली, आपल्या संसाराचा नाश होण्यास केवळ

विठ्ठल जबाबदार आहे. ही तिची मानसिकता आहे. त्यासाठी ती विठ्ठलाला नेहमी शिव्या-शाप देताना आढळते.

हा तिचा संघर्ष तिच्यातील गृहकृत्यदक्षता, संसाराची ओढ, राबणूक, तुकारामांवरील माया, कुटुंबवत्सलता, कष्टाळूवृत्ती इत्यादी गुणांना अधोरेखित करतो.

तुकाराम विठ्ठलाच्या नामस्मरणात गुंतले नसते तर ते प्रयत्नांकडे झुकले असते. पण विठ्ठलालाच तसे होवू द्यायचे नव्हते. त्यांना प्रापंचिक संघर्षात पडू द्यायचे नव्हते, त्यासाठी खुद्द विठ्ठलालाही संघर्ष करावा लागला आहे. कारण आवलीच्या जीवन संघर्षातील तिचा जोडीदार, तिचा आधार, सुखनिधान म्हणजे तुकाराम तेच तिच्या विठ्ठलापायी दुरावलं होतं. त्यामुळे तिच्या शिव्या या ओव्या समजून प्रत्येक घटना प्रसंगात त्यालाही संघर्ष करावा लागला आहे.

तुकारामांनी जसा अलौकिक पातळीवर विठ्ठलाप्राप्तीसाठी संघर्ष करावा लागला तसाच लौकिक पातळीवरही संघर्ष करावा लागला. तात्कालिन समजात ब्राह्मण लोकांचे वर्चस्व होते. त्यामुळे अब्राहमण समाजातील लोकांना धर्माच्या बाबतीतील कोणतेच अधिकार दिले नव्हते. वेदातील ज्ञान घेण्यास मनाई होती. मात्र तुकारामांनी हा कायदा मोडला होता. म्हणून त्यांना ब्राह्मण शिक्षा म्हणून त्यांनी लिहिलेले सर्व साहित्य पाण्यात सोडावयास भाग पाडतात. पोथ्या सोडण्याचा प्रसंग खुद्द तुकारामांवर येतो तेव्हा तुकाराम हतबल निराश होतात कारण हा संघर्ष त्यांच्या श्रद्धेचा, भक्तीचा आणि तत्कालिन समाजाच्या परंपराचा, पुरोगामीपणाचा, ब्राह्मणशाहीचा होता.

**रसाविस्कार**

नाट्यशास्त्रात भरतमुनीनी सर्वप्रथम रससिद्धान्त मांडला, त्यांनी प्रथम आठ रस मानले. पुढे या रसात शांत रसाचा समावेश झाला आणि रससंख्या नऊ बनली आणि मधुसूदन सरस्वती यांनी भक्तीरसाची भरटाकली आहे. ''रस म्हणजे आनंद, वेदान्त शास्त्राच्या दृष्टीने आनंद हे ब्रम्हाचे रूप आहे.''[१८]

तुकाराम महाराज हे लोककवी होते. त्यांची वाणी रंजनाच्या नव्हे तर भंजनाच्या भाषेतून बोलते. ते केवळ रसिक लोकांचे रंजन करण्याकरिता त्यांनी अंभग रचना केली नसून सर्व थरातील लोकांनी सन्मार्गावर यावे यासाठी अभंग रचना केली.

तुकारामांच्या जीवनात अनेक विदारक घटना घडल्या सर्वसामान्य लोकांची अवस्था त्यापेक्षाही वेगळी नव्हती त्यांनी स्वत:च्या डोळ्यांनी दुष्काळातील मृत्युची भयानकता पाहिली होती. तेव्हा स्वत:भक्तीमार्गाने ईश्वराला प्राप्त करून सामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रु पुसण्यासाठी भक्तीचा मार्ग स्वीकारला तत्कालिन समाजात ब्राह्मणवर्गाकडून समाज नाडला जात होता. शुद्रांना शिक्षण घेण्यास बंदी होती. वेदाचे वाचन मनन करण्यास मनाई होती. अशावेळी त्यांनी वेदातील ज्ञान स्वत:घेवून बहुजनाना ज्ञानी केले.

आपण संसार सोडून परमार्थाकडे झुकलो याच्या मुळाशी आपली पत्नी आवली हिला ते मोठेपण अर्पण करतात. तिच्यासारखी पत्नी होती म्हणूनच आपण इथपर्यंत पोहचल्याचे सांगतात. त्यासाठी ते म्हणतात.,

***बरे झाले देवा बाईल कर्कशा ।***

***बरी ही दुर्दशा जना मध्ये ।।***

***बरे झाले जगी पावलो अपमान।***

***बरे गेले धन, गुरे - ढोरे ।।***

प्रस्तुत अभंगातून त्यांनी भक्तीरसाचा उपयोग केला आहे. त्यांच्या दृष्टीकोणातून आवली संसारासाठी भांडली परंतु तिने संसाराशी दोन हात करून, झुंज देवून आपला संसार सावरला, दुष्काळात गुरे ढोरे गेली धन गेले, पदोपदी ब्राह्मणाकडून अपमानीत व्हावे लागले. त्यामुळे मी ईश्वरप्राप्तीचा मार्ग स्वीकारल्याचे सांगतात.

तुकारामांचे सारे आयुष्य अखंड संघर्षाचे प्रतिक आहे. त्यांनी विठ्ठल भक्तीत स्वत:ला झोकून दिले. ब्राह्मणशाही विरूद्ध दंड ठोकले यातून त्यांच्या काव्यातून भक्तीरस, शांतरस,वीररस यांचा मिलाफ असल्याचे जाणवते.

## संदर्भ सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जोशी, सुधा | : | 'कथा' संकल्पना आणि समीक्षा, मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, २००० पृष्ठ क्र. १८ |
| २) | गणोरकर, प्रभा. | : | 'वाङ्मयीन संज्ञा', संकल्पना कोश, प्रकाशन, ग. रा. भटकट फाऊंडेशन, मुंबई. पृ. क्र. १४५ |
| ३) | डहाके, वसंत आबाजी | : | 'विशिष्ट साहित्यप्रकार' : कादंबरी, मुंबई विद्यापीठ, प्रकाशन मुंबई, पृ. क्र. ३८ |
| ४) | गोखले, मंजुश्री | : | 'तुकयाची आवली', मेहता पब्लिशिंग, हाऊस पुणे, प्रथमावृत्ती नोव्हें. २००७, पृ. क्र. १३५ |
| ५) | नेमाडे, भालचंद्र | : | टीकास्वयंवर, सांकेत प्रकाशन, प्रथमावृत्ती, पृष्ट १६७ |
| ६) | संत, जान्हवी | : | कादंबरी, एक वाङ्मय प्रकार, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००७ पृ. क्र. १०२ |
| ७) | गोखले, मंजुश्री | : | 'तुकयाची आवली' मेहता पब्लिशिंग, हाऊस पुणे, प्रथमावृत्ती २००७, पृ. क्र. १०२ |
| ८) | गणोरकर, प्रभा आणि इतर | : | उ. नि. पृ. क्र. ११७ |
| ९) | पवार, गो. मा. | : | 'साहित्य मूल्य आणि अभिरूची' साकेत प्रकाशन, प्रा. लि., औरंगाबाद प्रथमावृत्ती १९९४ पृ. २०१ |
| १०) | देशपांडे, बालशंकर | : | 'कादंबरी विवेचन आणि विश्लेषण' स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८८ |



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

| | | |
|---|---|---|
| ११) गोखले, मंजुश्री | : | 'तुकयाची आवली' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती २००७ पृ. क्र. ७५ |
| १२) तत्रैव | : | पृ. क्र. ९० |
| १३) तत्रैव | : | पृ. क्र. १३५ |
| १४) तत्रैव | : | पृ. क्र. १४३,१४४ |
| १५) तत्रैव | : | पृ. क्र. १४४ |
| १६) तत्रैव | : | पृ. क्र. १४४ |
| १७) पाटील, म.सु. | : | 'साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध' शब्दालय, प्रकाशन, श्रीरामपूर प्रथमावृत्ती २००१ पृ. क्र. २८ |
| १७) संपा डॉ. पुंडे दत्तात्रय, डॉ.तावरे, स्नेहल | : | 'साहित्य विचार' स्नेहवर्धन, पब्लिशिंग हाऊस, पुणे तृ.आ. २००१ पृ. क्र. १५६ |